चालक

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ८६] सोमवार, जून २७, २०२२/आषाढ ६, शके १९४४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २३९

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ जून २०२२

### अधिसूचना

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक एमटीएस-०३१९/प्र.क्र.२४५/पोल-४.—महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सन १९५१ चा २२)याच्या कलम ५च्या खंड (ख) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमास,महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०२२ असे म्हणावे. सदर नियम **शासन राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ याच्या नियम ७ ते १० या ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येतील :—

"**७. शारीरिक चाचणी (५० गुण) :**

जे उमेदवार शारीरिक व शैक्षणिक अर्हता पूर्ण करतात अशा उमेदवारांना शारीरिक पात्रता चाचणी देणे आवश्यक असेल. शारीरिक चाचणी पुढीलप्रमाणे ५० गुणांची असेल :—

(अ) पुरुष उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | १६०० मीटर धावणे | - | ३० गुण |
| (ब) | गोळा फेक | - | २० गुण |
| | **एकूण** | **-** | **५० गुण** |

(ब) महिला उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | ८०० मीटर धावणे | - | ३० गुण |
| (ब) | गोळा फेक | - | २० गुण |
| | **एकूण** | **-** | **५० गुण** |

**८. लेखी चाचणी (१०० गुण) :**

(अ) शारीरिक चाचणीत किमान ५० टक्के गुण प्राप्त करणारे उमेदवार, संबंधित प्रवर्गामधील जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त जागांच्या १:१५ या प्रमाणात १०० गुणांच्या लेखी परीक्षेसाठी बोलावण्यास पात्र असतील.

**स्पष्टीकरण :** उदाहरणार्थ, जर अनुसूचित जाती प्रवर्गात १० रिक्त जागा आणि अनुसूचित जमाती प्रवर्गात ५ रिक्त जागा असतील, तर अनुसूचित प्रवर्गातील १५०(१५X१०=१५०) उमेदवारांना गुणवत्तेनुसार सूचीबध्द करण्यात येईल आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील ७५ (१५X५=७५) उमेदवारांना सूचीबध्द करण्यात येईल.

तथापि, गुणानुक्रमांक १५० वर असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवार म्हणून अनुसूचित जाती प्रवर्गातील ज्या उमेदवारांना सारखेच गुणे मिळालेले आहेत असे सर्व उमेदवार, लेखी चाचणीला बसण्यासाठी बोलावण्यास पात्र असतील. त्याचप्रमाणे गुणानुक्रमांक ७५ असलेल्या अनुसूचित जमातीतील ज्या उमेदवारांना ७५ गुणानुक्रमांक असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार म्हणून सारखेच गुण मिळालेले आहेत असे सर्व उमेदवार, लेखी चाचणीला बसण्याकरिता बोलावण्यास पात्र असतील.

(ब) लेखी चाचणीमध्ये पुढील विषयांचा समावेश असेल :—

१. अंकगणित,

२. सामान्यज्ञान व चालु घडामोडी,

३. बुध्दीमत्ता चाचणी,

४. मराठी व्याकरण, आणि

५. मोटार वाहन चालविणे / वाहतुकी बाबतचे नियम.

(क) लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटे इतका असेल, लेखी चाचणीमध्ये विचारलेले प्रश्न वस्तुनिष्ट प्रकारचे असतील आणि ही चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल.

**९. वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी (५० गुण) :**

(एक) लेखी चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना, वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी खालीलप्रमाणे द्यावी लागेल. सदर दोन्ही चाचण्यांमध्ये एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवून उमेदवारास उत्तीर्ण व्हावे लागेल.

(दोन) कौशल्य चाचणीमध्ये पुढील चाचण्यांचा समावेश असेल :—

(अ) हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी - २५ गुण

(ब) जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी - २५ गुण

(तीन) कौशल्य चाचणीही केवळ एक अर्हता चाचणी असून कौशल्य चाचणीत मिळालेले गुण, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकूण गुणात समाविष्ट केले जाणार नाहीत.

(चार) वाहन चालविण्यातील कौशल्य चाचणीचे निकष, महासंचालकाकडून वेळोवेळी ठरविण्यात येतील.

(पाच) वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी घेण्याकरिता, समितीमध्ये प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

१०. पोलीस महासंचालकांनी त्या घटकासाठी गठीत केलेले निवड मंडळ, हे या नियमांना पोट-नियम ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या शारीरिक चाचणी व लेखी चाचणी मधील प्राप्त एकत्रित गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करील. शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये प्राप्त होणारे गुण एकत्र केल्यानंतर, उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी ही सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या, शासन निर्णयाप्रमाणे करण्यात येईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**शिरीष मोहोड,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 27th June 2022

*NOTIFICATION*

MAHARASHTRA POLICE ACT.

No. MTS-0319/CR-245/Pol-4.—In exercise of the powers conferred by clause *(b)* of section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) Rules, 2019, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) (Amendment) Rules, 2022.

2. For rules 7 to 10 of the Maharashtra Assistant Police Sub-Inspector Driver, Police Head Constable Driver, Police Naik Driver and Police Constable Driver (Recruitment) Rules, 2019, the following rules shall be substituted, namely :—

**"7. Physical Test (50 marks) :**

The candidates who fulfill the physical and educational qualifications shall be required to appear for physical fitness test.The physical test shall be of 50 marks as follows :—

**(A) Male Candidates**

| | | | |
|---|---|---|---|
| (A) | 1600 Meters Running | - | 30 Marks |
| (B) | Shot-put | - | 20 Marks |
| | **Total Marks** | - | **50 Marks** |

**(B) Female Candidates**

| | | | |
|---|---|---|---|
| (A) | 800 Meters Running | - | 30 Marks |
| (B) | Shot-put | - | 20 Marks |
| | **Total Marks** | - | **50 Marks** |

**8. Written Test (100 Marks) :**

(A) Candidates securing a minimum of 50 % marks in physical test shall be eligible to be called to appear for a written test of 100 marks in the ratio of 1:15 of vacancies advertised in the respective categories.

*Explanation*.— For example, if there are 10 vacancies in the Scheduled Caste category and 5 vacancies in the Scheduled Tribes category, then 150 (15 X 10 = 150) candidates will be listed on merit in the Scheduled Caste category and 75 (15 X 5=75) candidates will be listed in the Scheduled Tribes category.

However, all the candidates in the Scheduled Caste category who have secured the same marks as the Scheduled Caste category candidate at the 150th rank shall be eligible to be called to appear for a written test. Similarly, all Scheduled Tribes category candidates who have secured the same marks as Scheduled Tribes category candidate at the 75th rank will be eligible to be called to appear for a written test.

(B) The Written Test shall include the following subjects, namely :—

(1) Arithmetic,

(2) General Knowledge and Current Affairs,

(3) Intelligence Test,

(4) Marathi Grammar, and

(5) Motor vehicle driving and transport Rules.

(C) Duration of written test shall be 90 minutes. Questions asked in written test shall be objective type and test shall be conducted in Marathi language.

**9. Skill Test for vehicle driving (50 Marks) :**

(*i*) Candidates selected for Written test shall also have to undergo vehicle driving skill test mentioned below. Candidates shall have to secure a minimum of 40% marks in both skill tests taken together.

(*ii*) The skill test shall be consist of—

(A) Light motor vehicle driving test - 25 marks

(B) Jeep types vehicle driving test - 25 marks

(*iii*) The skill test being only a qualifying test, marks obtained in skill test shall not be included in the total marks considered for preparing merit list.

(*iv*) The criteria for skill test in driving shall be decided by Director General from time to time.

(*v*) Officers from Regional Transport Authority should be included in the Committee for conducting skill test in driving.

**10.** Selection Board constituted by the Director General shall prepare a merit list from amongst the candidates based on the total marks obtained in the physical test and written test mentioned in rules 7 and 8. After addition of marks obtained in Physical Test and Written Test, the final merit list shall be prepared as per steps mentioned in the Government Resolution, issued by the General Administration Department in this regard from time to time."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHIRISH MOHOD,
Deputy Secretary to the Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.